चाणक्य मंडल परिवार

**प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000**

**BOOKLET No.**

**प्रश्नपुस्तिका**

**एकूण प्रश्न : 50**

**वेळ : 1 (एक) तास** **Paper 9** **एकूण गुण : 100**

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

चाणक्य मंडल परिवार

1. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग कधी स्थापन झाला?

(1) 19 फेब्रुवारी 2004 (2) 19 फेब्रुवारी 2003
(3) 9 ऑगस्ट 2003 (4) 15 नोव्हेंबर 2004

When was the National Commission for Scheduled Tribes established?

(1) 19 February 2004 (2) 19 February 2003
(3) 9 August 2003 (4) 15 November 2004

---

2. महालेखापरीक्षकासंबंधी अयोग्य विधान ओळखा.

(1) ते फक्त संसदेला उत्तरदायी आहेत.
(2) ते कोणत्याही कराचे उत्पन्न प्रमाणित करतात.
(3) ते राज्य सरकारचे लेखे संकलित आणि प्रमाणित करतात.
(4) भारताच्या संचित निधीतून पैसे काढण्यावर त्यांचे नियंत्रण असते.

Which of the following statements with regards to the Comptroller and Auditor General (CAG) are incorrect?

(1) He is responsible only to the Parliament.
(2) He certifies the net proceeds of any tax.
(3) He complies and maintains the accounts from the Governments.
(4) He has control over the issue of money from the consolidated fund of India.

---

3. राज्य लोकसेवा आयोगाच्या स्वातंत्र्याची खात्री देणाऱ्या तरतुदींबाबत कोणते/ती विधान/ने अयोग्य आहे/त?

(अ) सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीअंती राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षास गैरवर्तन आणि अकार्यक्षमता या कारणावरून राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करतात.
(ब) राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या नियुक्तीनंतर त्यांना प्रतिकूल ठरतील अशा प्रकारचे बदल सेवा शर्तीमध्ये करता येत नाहीत.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) दोन्हीही अयोग्य (4) दोन्हीही योग्य

Which of the following statements regarding the provisions assuring the independence of the State Public Service Commission is/are incorrect?

(a) The President removes the chairman of state public service commission from office due to misconduct and incompetence after the enquiry of Supreme Court.
(b) The conditions of the service of the chairman of state public service commission cannot be varied to his disadvantage after his appointment.

Answer Options :

(1) Only a (2) Only b
(3) Both incorrect (4) Both correct



चाणक्य मंडल परिवार

4. भारताच्या महान्यायवादी बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

(1) ते पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी पदावर राहतात.

(2) मंत्रिमंडळाची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहतात.

(3) संसद ठरवेल त्याप्रमाणे त्यांना मानधन मिळते.

(4) संसद सदस्यास मिळणारे सर्व विशेषाधिकार संरक्षण व फायदे त्यांना मिळतात.

Which one of the following statements regarding the Attorney General of India is correct?

(1) He holds office for a term of five years.

(2) He holds office during the pleasure of the Council of Ministers.

(3) He receives such remuneration as the Parliament may determine.

(4) He enjoys all the privileges and immunities that are available to a Member of Parliament.

---

5. पुढील विधाने विचारात घ्या.

(अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना 1 मे 1960 ला झाली.

(ब) मुंबई लोकसेवा आयोग पूर्वी मुंबई व गुजरात राज्यांसाठी होते.

(क) आयोगाचे मूळ मुंबई व सिंध साठीच्या आयोगात आहे.

कोणते/कोणती विधान/ने बरोबर आहे/त?

(1) फक्त अ (2) अ व ब

(3) अ व क (4) अ, ब व क

Consider the following statements.

(a) Maharashtra Public Service Commission was established on 1 May 1960

(b) Earlier Mumbai Public Service Commission was for the states of Mumbai and Gujarat.

(c) The origin of the Commission is in the Commission for Bombay and Sindh.

Which statement(s) is/are correct?

(1) Only a (2) a and b

(3) a and c (4) a, b and c

चाणक्य मंडल परिवार

6. भारतीय निर्वाचन आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) केवळ मुख्य निर्वाचन आयुक्तांना आपल्या कार्यकाळाची सुरक्षितता आहे. परंतु इतर निर्वाचन आयुक्तांना तशी सुरक्षितता नाही.

(2) मुख्य निर्वाचन आयुक्तांचे स्थान अथवा दर्जा हा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश समान आहे.

(3) मुख्य निर्वाचन आयुक्त हे केवळ समानातील प्रमुख आहेत.

(4) जर एखाद्या बाबतीत मुख्य निर्वाचन आयुक्त आणि इतर निर्वाचन आयुक्त यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले तर त्या बाबींचा निर्णय बहुमताने घेतला जातो.

Which one of the following statements about Election Commission of India is false?

(1) Only the Chief Election Commissioner has a security of tenure but not to the other Election Commissioners.

(2) The Chief Election Commissioner holds the position or status of a judge of the High Court.

(3) The Chief Election Commissioner is merely first among equals.

(4) In case of difference of opinion amongst the Chief Election Commissioner and other Election Commissioners, the matter is decided by majority.

---

7. राष्ट्रीय निवडणूक आयोगासंबंधी खालीलपैकी अयोग्य विधान कोणते?

(1) राज्यघटनेने निवडणूक आयुक्तपदासाठी पात्रता निकष सांगितलेले नाहीत.

(2) राज्यघटनेमध्ये निवडणूक आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल सांगितलेला नाही.

(3) निवृत्त होणाऱ्या निवडणूक आयुक्ताची शासनाद्वारे इतर पदावर नियुक्ती करण्यास राज्यघटनेने बंदी घातलेली आहे.

(4) निवडणुकीत नियमबाह्य घटना घडल्यास निवडणुका रद्द करण्याचा पूर्णतः अधिकार निवडणूक आयोगाला आहे, त्याविरोधी न्यायालयात अपील करता येत नाही.

Which of the following statements related to election commission of India are incorrect?

(1) The Constitution does not specify the eligibility criteria for the office of Election Commissioner.

(2) The Constitution does not specify the tenure of the members of the Election Commission.

(3) The constitution has debarred the retiring election commissioner from any further appointment by the Government.

(4) The Election Commission has full-fledged authority to cancel the elections in case of any irregularity in the election, No appeal can be done against it in the court.

8. वित्त आयोगाचे सदस्य होण्यासाठी पुढील पात्रता असणे आवश्यक असते.

(अ) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा त्या पदावर नियुक्त होण्यासाठी आवश्यक अर्हता असलेली व्यक्ती.

(ब) सरकारी वित्त व लेखा प्रणाली याचे विशेष ज्ञान असलेली व्यक्ती.

(क) वित्तीय बाबी व प्रशासन यांबाबत विस्तृत अनुभव असलेली व्यक्ती.

(ड) अर्थशास्त्रातील विशेष ज्ञान असलेली व्यक्ती

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त अ, क, ड
(3) फक्त अ, ब आणि क
(4) वरीलपैकी सर्व

To be a member of the Finance Commission the following qualifications are required.

(a) A Judge of a High Court or a person having the necessary qualifications to be appointed to that post.

(b) A person with special knowledge of government finance and accounting system.

(c) A person with extensive experience in financial matters and administration.

(d) A person with special knowledge in economics.

Alternative Answers:

(1) a and b only
(2) a, c, d only
(3) a, b, c only
(4) All of the above

---

9. 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) मूळतः राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची (NCBC) स्थापना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग अधिनियम 1991 अन्वये झालेली आहे.

(2) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगास 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे घटनात्मक दर्जा प्रदान करण्यात आला.

(3) 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे राज्यघटनेत अनुच्छेद 338 B आणि 342 A यांचा समावेश करण्यात आला.

(4) 102 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे अनुच्छेद 338 आणि 366 मध्ये बदल करण्यात आला.

Which one of the following statements about 102$^{nd}$ Amendment Act is incorrect?

(1) The National Commission for Backward Classes (NCBC) was originally set up under the NCBC Act of 1991.

(2) 102$^{nd}$ amendment act granted Constitutional status to the NCBC.

(3) 102$^{nd}$ amendment act inserted Article 338 B and 342 A into the Constitution.

(4) 102$^{nd}$ amendment act amended Article 338 and 366.



चाणक्य मंडल परिवार

10. खालील विधाने विचारात घ्या.
(अ) सध्या राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष हर्ष चव्हाण हे आहेत.
(ब) सध्या राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे अध्यक्ष विजय सांपला हे आहेत.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त अ अयोग्य (2) फक्त ब अयोग्य
(3) दोन्ही अयोग्य (4) दोन्ही योग्य
Consider the following statements.
(a) Presently the Chairman of the National Commission for Scheduled Castes is Harsh Chavan.
(b) Presently the Chairman of the National Commission for Scheduled Tribes is Vijay Sampala.
Alternative Answers :
(1) Only a is incorrect (2) Only b is incorrect
(3) Both are incorrect (4) Both are correct

---

11. भारतीय राज्यघटनेनुसार, संघ लोकसेवा आयोगाच्या कार्याचा विस्तार करण्याचे अधिकार खालीलपैकी कोणाला आहेत?
(1) राष्ट्रपती (2) संसद
(3) संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष (4) कार्मिक मंत्रालय
Under the Constitution of India, the power to extend functions of the Union Public Service Commission has been vested in the ___.
(1) President of India (2) Parliament
(3) Chairman of Union Public Service Commission (4) Ministry of Personnel

---

12. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक आपला अहवाल कोणाला सादर करतात?
(अ) राष्ट्रपती (ब) राज्यपाल
(क) संसद (ड) लोकसभा अध्यक्ष
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त अ (2) अ, ब
(3) अ, ब, क (4) अ, क
The CAG of India submits his audit reports to ___.
(a) President (b) Governor
(c) Parliament (d) Loksabha Speaker
Answer options :
(1) Only a (2) a, b
(3) a, b, c (4) a, c

13. पुढील विधाने विचारात घ्या.

(अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना कलम 315 अंतर्गत करण्यात आली आहे.

(ब) दोन किंवा अधिक राज्यांसाठी स्थापन करण्यात येणारा संयुक्त लोकसेवा आयोग बिगर घटनात्मक असतो.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त व बरोबर

(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

Consider the following statements.

(a) Maharashtra Public Service Commission is constituted under article 315 of the constitution.

(b) An Joint Public Service Commission created for two or more states is a extra-constitutional body.

Answer Options :

(1) Only a correct (2) Only b correct

(3) Both are correct (4) Both are incorrect

---

14. भारताच्या महालेखापरीक्षकाकरिता कार्यकारी मंडळाचा हस्तक्षेप टाळून स्वतंत्रपणे काम करता यावे, यासाठी संविधानात कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

(अ) त्यांना पदावरून काढून टाकण्यासाठी महाभियोग प्रक्रियेचा अवलंब करावा लागतो.

(ब) निवृत्तीनंतर ते इतर शासकीय पदासाठी अपात्र ठरतात.

(क) ते थेट राष्ट्रपतींना उत्तरदायी असतात.

(ड) लेखापरीक्षणाच्या कामात मदत करण्यासाठी त्यांना हुशार आणि निष्पक्ष सनदी लेखापाल उपलब्ध करून दिले जातात.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ आणि ब बरोबर आहेत (2) अ, ब आणि क बरोबर आहेत

(3) फक्त ब आणि क बरोबर आहेत (4) फक्त अ आणि ड बरोबर आहेत

Whats a feguards have been woven into our Constitution in order to enable the Comptroller and AuditorGeneral of India to function impartially and independently of any control of the Executive?

(a) He can be removed from office by Impeachment procedure.

(b) He shall be disqualified from all Government offices after retirement.

(c) He is made directly answerable to the President.

(d) He is given a team of qualified and impartial Chartered Accountants to assist in his task of Auditing.

Answer options :

(1) Only a and b are correct (2) Only a, b and c are correct

(3) Only b and c are correct (4) Only a and d are correct

15. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या बाबतीत अचूक उत्तरे निवडा.

(अ) केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सदस्यपद सोडल्यानंतर राज्य लोकसेवा आयोगाच्या किंवा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदासाठी पात्र असतो.

(ब) केंद्रीय लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष ए. आर. किडवाई यांची बिहारच्या राज्यपालपदी नियुक्ती 1979 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरली.

(क) अनुपस्थितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे अध्यक्ष काम करण्यास असक्षम असतो तेव्हा राष्ट्रपती UPSC च्या एका सदस्याला हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकतो.

(ड) UPSC ने निवड केल्याने उमेदवाराचा त्या पदावर अधिकार निर्माण होतो.

पर्यायी उत्तरे :

(1) अ आणि ड (2) ब आणि क

(3) अ, ब आणि क (4) वरील सर्व

Select the correct answers in case of Union Public Service Commission.

(a) After leaving the post of member of Union Public Service Commission member is Eligible for the post of Chairman of Union Public Service Commission.

(b) In 1979 supreme court accepted the appointment Former Chairman of Central Public Service Commission A. R. Kidwai as Governor of Bihar.

(c) President may appoint a member of UPSC as temporary chairman when the chairman is unable to perform the duties due to absence or some other reasons.

(d) Selection by UPSC makes the candidate eligible for that post.

Alternative Answers:

(1) a and d (2) b and c

(3) a, b and c (4) All of the above

---

16. अयोग्य कथन ओळखा.

(1) भारताच्या निवडणूक आयोगाने 2000 साली त्यांचा सुवर्ण महोत्सव साजरा केला.

(2) भारताचा निवडणूक आयोग ही स्थायी संवैधानिक संस्था आहे.

(3) भारताच्या निवडणूक आयोगाने मतदार शिक्षण आणि निवडणुकीतील सहभाग हा निवडणूक व्यवस्थापनाचा अविभाज्य भाग म्हणून 2009 मध्ये औपचारिकरित्या स्वीकारला.

(4) राजीव कुमार हे भारताचे 25वे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत.

Select the incorrect statement.

(1) The Election Commission of India celebrated its Golden Jubilee in the year 2000.

(2) Election Commission of India is a permanent constitutional body.

(3) Election Commission of India, in 2009, formally adopted voter education and electoral participation as an integral part of its election management.

(4) Rajiv Kumar is the 25$^{th}$ Chief Election Commissioner of India.



चाणक्य मंडल परिवार

17. वित्त आयोगाबाबतची योग्य विधाने :
(अ) भारतीय आर्थिक संघराज्यवादाचे समतोल साध्य करण्यासाठीचे कार्य करणारे साधन.
(ब) एक अध्यक्ष आणि इतर तीन सदस्यांचा समावेश असलेला आयोग.
(क) आयोगाच्या सदस्यांची पात्रता राष्ट्रपतींकडून ठरविली जाते.
(ड) कलम 280 च्या तरतुदीनुसार निर्मिती.
पर्यायी उत्तरे :
(1) ब, क आणि ड (2) ब आणि क
(3) अ, ब आणि क (4) अ आणि ड
Correct statements about Finance Commission :
(a) A working instrument for achieving equilibrium of Indian economic federalism.
(b) Commission consisting of a Chairman and three other members.
(c) The qualifications of the members of the Commission are determined by the President.
(d) Established under the provisions of article 280.
Alternative Answers:
(1) b, c and d (2) b and c
(3) a, b and c (4) a and d

---

18. अचूक विधाने ओळखा.
(अ) 65व्या घटनादुरुस्तीद्वारे 1990 मध्ये अनुसूचित जाती जमातीसाठी एक संविधानिक राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतूद केली गेली.
(ब) 89व्या घटनादुरुस्तीने 2003 मध्ये अनुसूचित जाती व जमातीसाठीच्या संयुक्त आयोगाच्या विभाजनाची तरतूद केली.
(क) 86व्या घटनादुरुस्तीद्वारे राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यात आला.
(ड) वरील तिन्ही आयोगांच्या सदस्यांची व अध्यक्षांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब, क (2) ब, क, ड
(3) अ, ब, ड (4) वरीलपैकी सर्व
Identify the correct statements.
(a) The 65th constitutional amendment in 1990 provided for a constitutional national commission for scheduled castes and scheduled tribes.
(b) The 89th constitutional amendment provided for the bifurcation of the combined national commission for SCs and STs in 2003.
(c) 86th Constitutional amendment gave constitutional status to the National Commission of Human Rights.
(d) The Chairman and members of the above three commissions are appointed by the President.
Alternative Answers:
(1) a, b, c (2) b, c, d
(3) a, b, d (4) All of the above



चाणक्य मंडल परिवार

19. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात.

(ब) या आयोगामध्ये 1 अध्यक्ष आणि 3 सदस्य असतात.

(क) अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल तीन वर्षे इतका असतो.

(ड) सदस्य केवळ एकदाच पुनर्नेमणुकीस पात्र असतात.

वरीलपैकी असत्य विधाने ओळखा.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क (2) अ, क, ड

(3) अ, ब, ड (4) वरीलपैकी सर्व

Consider the following statements regarding the National Commission for Backward Classes.

(a) Chairman and members of the National Commission for Backward Classes are appointed by the President.

(b) This commission consists of a chairman and three members.

(c) The term of office of the Chairman and members is three years.

(d) Members are eligible for reappointment only once.

Which of the above statements is not correct?

Alternative Answers:

(1) a, b, c (2) a, c, d

(3) a, b, d (4) All of the above

---

20. अचूक जोडी ओळखा. (कलम: व्याख्या)

(1) कलम 366 (24) : अनुसूचित जाती

(2) कलम 366 (25) : अनुसूचित जमाती

(3) कलम 366 (26) (c) : सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग

(4) वरील सर्व

Identify the correct pair. (Section: Definition)

(1) Article 366 (24) : Scheduled Castes

(2) Article 366 (25) : Scheduled Tribes

(3) Article 366 (26) (c) : Socially and educationally backward classes

(4) All of the above



चाणक्य मंडल परिवार

21. संघ लोकसेवा आयोगाच्या सदस्याच्या पदसमाप्तीनंतर खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?

(1) तो संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असतो.

(2) तो कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य म्हणून नियुक्तीस पात्र असतो.

(3) तो कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असतो.

(4) तो भारत सरकारच्या नोकरीसाठी अपात्र आहे.

Which one of the following statement about a member of Union Public Service Commission on his ceasing to hold office is incorrect?

(1) He is eligible to be appointed as chairman of the UPSC.

(2) He is eligible to be appointed as member of any SPSC.

(3) He is eligible to be appointed as chairman of the SPSC.

(4) He is not eligible for employment under the Government of India.

---

22. भारताचे महान्यायवादी यांच्याशी संबंधित खालील विधानांपैकी सर्वात योग्य विधान निवडा.

(1) त्यांना भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व न्यायालयांमध्ये ऐकून घेतले जाण्याचा अधिकार आहे.

(2) ते फक्त सर्वोच्च न्यायालयात आपले कर्तव्य बजावू शकतात.

(3) त्यांच्या पदाचा पदावधी निश्चित असतो.

(4) राष्ट्रपती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्यास अर्हताप्राप्त असलेल्या व्यक्तीची महान्यायवादी म्हणून निवड करतात.

Which one of the following statements is correct with regard to the office of the Attorney General of India?

(1) He shall have the right of audience in all the Courts within the territory of India.

(2) He shall perform his duties only in the Supreme Court.

(3) He enjoys a fixed tenure.

(4) The president appoints a person who is qualified to be a judge of a High Court, to be the Attorney General of India.

23. योग्य विधान/ने ओळखा.

(अ) भारताचे महान्यायवादी यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

(ब) त्यांचा दर्जा हा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे असतो.

(क) राष्ट्रपती त्यांना केव्हाही पदावरून दूर करू शकतात.

(ड) भारताचे महान्यायवादी यांना संसद सदस्यांना मिळणारे सर्व विशेषाधिकार तसेच दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व संयुक्त बैठकीमध्येही भाग घेण्याचा आणि आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ, क, ड
(2) फक्त अ, ड
(3) फक्त ब, क, ड
(4) सर्व विधाने योग्य आहेत

Find the correct statement.

(a) The Attorney General of India is appointed by the President.

(b) His status is equal to the judge of Supreme Court.

(c) He can be removed by the president any time.

(d) He enjoys all the privileges that are available to the member of parliament and he has right to take part and to speak in the proceedings of both houses of Parliament or their joint sitting.

Answer Options :

(1) Only a, c, d
(2) Only a, d
(3) Only b, c, d
(4) All statements are correct

---

24. खालीलपैकी कोणता/ते पर्याय भारताच्या महान्यायवादी संदर्भात चुकीचे आहे/त?

(1) राष्ट्रपती सरकारच्या सल्ल्याने महान्यायवादीची नियुक्ती करतात.

(2) तो/ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त होण्यास पात्र असणारी व्यक्ती असावी.

(3) त्याने कोणत्याही उच्च न्यायालयात दहा वर्षे न्यायाधीशपदी काम केले असले पाहिजे.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which of the following option is not correct about India's Attorney General?

(1) Attorney General is appointed by the President on the advice of Government.

(2) He/She must be a person who is qualified to be appointed as a judge of the Supreme Court.

(3) He/She should have served as a judge in any High Court for ten years.

(4) None of the above.

25. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) संयुक्त राज्य लोकसेवा आयोगाच्या स्थापनेची राज्यघटनेत तरतूद नाही.

(2) संयुक्त राज्य लोकसेवा आयोग हा संसदेच्या कायद्याद्वारा निर्माण करता येतो.

(3) संयुक्त राज्य लोकसेवा आयोग ही घटनात्मक संस्था नसून ती एक वैधानिक संस्था आहे.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which of the following statements is incorrect?

(1) Constitution does not provide for establishment of United-states Public Service Commission.

(2) The United-states Public Service Commission may be created by an Act of Parliament.

(3) The United-states Public Service Commission is not a constitutional body but a statutory body.

(4) None of the above.

---

26. अयोग्य कथन ओळखा.

(1) भारताचा निवडणूक आयोग ही एक स्थायी संवैधानिक संस्था आहे.

(2) निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी, 1950 रोजी झाली.

(3) 16 ऑक्टोबर 1990 रोजी पहिल्यांदा दोन अतिरिक्त आयुक्त भारतीय निवडणूक आयोगात नेमण्यात आले.

(4) मुख्य निवडणूक आयुक्ताची नेमणूक राष्ट्रपती करतात.

Select the incorrect statement.

(1) Election Commission of India (ECI) is a permanent constitutional body.

(2) The Election Commission was established on $25^{th}$ January, 1950.

(3) First time two additional commissioners in ECI were appointed on $16^{th}$ October, 1990.

(4) The President appoints the Chief Election Commissioner.

---

27. वित्त आयोगासंबंधी असत्य विधान ओळखा.

(1) राष्ट्रपतींना दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करावी लागेल.

(2) वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतात.

(3) आयोगाच्या सदस्यांची अर्हता व निवडीची प्रक्रिया ठरविण्याचे अधिकार राज्यघटनेने संसदेला दिले आहेत.

(4) यापैकी नाही.

Identify incorrect statement regarding Finance Commission.

(1) The President has to establish the Finance Commission every five years.

(2) Chairman and members of the Finance Commission are eligible for reappointment.

(3) Parliament is empowered by the Constitution to determine the qualification and selection process of the members of the Commission.

(4) None of these.

---



चाणक्य मंडल परिवार

28. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाबाबत (NCST) खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
(अ) ही एक घटनात्मक संस्था आहे, जी 2004 मध्ये अस्तित्वात आली आहे.
(ब) अनुसूचित जमातीच्या हक्क आणि संरक्षणाच्या वंचनेविरोधात विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे, हे आयोगाचे कार्य आहे.
(क) आदिवासी समाजाचा साक्षरता दर सुधारण्यासाठी हा आयोग काम करतो.
(ड) आदिवासी महिलांचे सक्षमीकरण सुलभ करणे, हे आयोगाचे कार्य आहे.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब
(3) फक्त अ, ब आणि क (4) वरीलपैकी सर्व
Which of the following statements is/are correct about National Commission for Scheduled Tribes (NCST)?
(a) It is a constitutional body which came into existence in 2004.
(b) Its function is to inquire into specific complaints with respect to the deprivation of rights and safeguards of Scheduled Tribes.
(c) It works to improve literacy rate of Tribal community.
(d) Its function is to facilitate women empowerment of Tribal women.
Answer Options :
(1) Only a (2) Only a and b
(3) Only a, b and c (4) All of the Above

---

29. (अ) पहिला मागासवर्गीय आयोग काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली 1956 मध्ये नेमण्यात आला.
(ब) दुसरा मागासवर्गीय आयोग बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली 1979 मध्ये नेण्यात आला.
(क) 1992 च्या इंद्र सहानी खटल्याअंतर्गत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग या वैधानिक आयोगाची स्थापना करण्यात आली.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त अ अयोग्य (2) फक्त ब अयोग्य
(3) फक्त क अयोग्य (4) यापैकी कोणतेही विधान अयोग्य नाही.
(a) The first Backward Classes Commission was appointed in 1956 under the chairmanship of Kakasaheb Kalelkar.
(b) Second Backward Classes Commission was appointed in 1979 under the chairmanship of B. P. Mandal.
(c) The National Commission for Backward Classes, a statutory commission was set up under the Indra Sahani case of 1992.
Alternative Answers :
(1) Only a is incorrect (2) Only b is incorrect
(3) Only c is incorrect (4) None of these statements is incorrect.



चाणक्य मंडल परिवार

30. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.
(अ) आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्ती व कार्यकाल ठरवण्याचा अधिकार संसदेला असतो.
(ब) हा आयोग राष्ट्रपतीला वार्षिक अहवाल सादर करतो.
(क) आयोगाच्या ज्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या नसतील त्यांची कारणे देणे आवश्यक असते.
वरीलपैकी सत्य विधान कोणते?

(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) ब आणि क (4) अ आणि क

Consider the following statements regarding the National Commission for Scheduled Castes.
(a) The Parliament has the power to determine the terms of service and tenure of the Chairman and members of the Commission.
(b) This commission submits an annual report to the President.
(c) Reasons should be given for the Commission's recommendations not being considered.
Which of the above statements is correct?

(1) Only a (2) Only b
(3) b and c (4) a and c

---

31. संघ लोकसेवा आयोगाच्या कार्याबाबत खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.
(अ) केंद्रीय सेवांमध्ये भरतीसाठी परीक्षांचे आयोजन करणे.
(ब) विनंती केल्यास ज्या सेवांसाठी विशेष पात्रता असलेले उमेदवार आवश्यक आहेत अशा कोणत्याही सेवांसाठी संयुक्त भरतीच्या योजना तयार करण्यास राज्यांना मदत करणे.
(क) नागरी सेवा व भरतीच्या पद्धतीशी संबंधित सर्व बाबींवर केंद्र आणि राज्य सरकारांना सल्ला देणे.
(ड) दरवर्षी राष्ट्रपतींना अहवाल सादर करणे.
पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क (2) अ, क, ड
(3) अ, ब, ड (4) अ, ब, क, ड

Which of the following are correct with regard to the function of the UPSC?
(a) To conduct examinations for appointment to the services of the union.
(b) To assist states, if requested in forming and operating schemes for recruitment for any services for which candidates possessing special qualification are required.
(c) To advise the union and State governments on all matters relating to methods of requirements to Civil services.
(d) To present annual report to President.
Answer options :

(1) a, b, c (2) a, c, d
(3) a, b, d (4) a, b, c, d

---



चाणक्य मंडल परिवार

32. राज्याच्या महाधिवक्त्याला उपलब्ध असलेले सर्व विशेष अधिकार आणि संरक्षण ___च्या समक्ष आहेत.

(1) संसद सदस्य (2) राज्य विधीमंडळाचे सदस्य

(3) राज्याचे राज्यपाल (4) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश

The Advocate General of State enjoys all the privileges and immunities that are available to

(1) A member of the Parliament of India (2) A member of the State Legislature

(3) Governor of the State (4) A judge of a High Court.

---

33. पुढील विधाने विचारात घ्या.

(अ) भारताचे महालेखापरीक्षक (CAG) यांना राष्ट्रपती शपथ देतात.

(ब) अग्रक्रमतालिकेमध्ये त्यांचे स्थान 9A आहे.

(क) कलम 151 नुसार CAG केंद्राविषयीचा अहवाल राष्ट्रपतींकडे सुपूर्द करतात.

(ड) भारताचे महालेखापरिक्षक हे संसदेचे प्रतिनिधी (Agent) असून संसदेच्यावतीने लेखा परीक्षण करतात.

अयोग्य विधान ओळखा.

(1) वरीलपैकी एकही नाही (2) फक्त ब, ड

(3) फक्त अ, ब (4) फक्त ब, क

Consider the following statements.

(a) Comptroller and Auditor General of India (CAG) makes and subscribes the oath / affirmation before the President.

(b) In the table of Precedence CAG ranks 9A.

(c) CAG submits the audit reports relating to the accounts of centre to President as prescribed in the article 151.

(d) CAG is the agent of parliament and conducts the audits on behalf of the Parliament.

Choose the incorrect statement.

(1) None of the above (2) Only b, d

(3) Only a, b (4) Only b, c



चाणक्य मंडल परिवार

34. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) महालेखापरीक्षकाचे (CAG) वेतन आणि भत्ते राष्ट्रपती ठरवितात.

(ब) महालेखापरीक्षक हे लेखा (Accounting) आणि लेखापरीक्षण (Audit) ही दोन्हीही कार्ये पार पाडतात.

(क) महालेखा परीक्षकाचे वेतन आणि भत्ते भारताच्या आकस्मिक निधीतून दिले जाते.

(ड) महालेखा परीक्षक हे राष्ट्रपतींची इच्छा असेपर्यंत पदावर राहतात.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

(1) फक्त अ आणि ब (2) ब आणि क

(3) फक्त ड (4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following statements:

(a) The salary and allowances of the Comptroller Auditor General (CAG) are determined by the President.

(b) The CAG performs both accounting and audit functions.

(c) The salary and allowances of the CAG are paid out of contingency fund of India.

(d) The CAG holds office during the pleasure of the President.

Which of the statements given above is/are correct?

(1) a and b only (2) b and c

(3) Only d (4) None of the above

---

35. विधान (A) : राज्यघटनेच्या अनुच्छेद 76 मध्ये भारताच्या महालेखापरिक्षकाच्या नेमणुकीबाबत आणि सेवा शर्तीबाबत तरतुदी आहेत.

कारण (R) : त्याला घटनात्मक संरक्षण नसल्यास तो स्वतंत्रपणे कार्य करू शकणार नाही.

(1) विधान A आणि R दोन्हीही बरोबर असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(2) विधान A आणि R दोन्हीही बरोबर असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(3) विधान A बरोबर परंतु R चुकीचे

(4) विधान A चुकीचे परंतु R हे बरोबर

Statement (A) : In Article 76 of the Constitution there are provisions service conditions regarding the appointment of the Auditor General of India

Reason (R) : He cannot act independently if he has no constitutional protection.

(1) Both statements A and R are correct and R is the correct explanation of A.

(2) Both statements A and R are correct and R is not a correct explanation of A.

(3) Statement A is correct but R is incorrect

(4) Statement A is wrong but R is correct

36. अयोग्य कथन ओळखा.

(1) भारताचे मुख्य निवडणूक आयुक्ताची नेमणूक राष्ट्रपतीद्वारे केली जाते.

(2) मुख्य निवडणूक आयुक्ताचा कार्यकाळ 5 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे यापैकी जे आधी येईल तो असतो.

(3) मुख्य निवडणूक आयुक्त यांना भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश इतका दर्जा असतो.

(4) मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरून महाभियोगाद्वारे संसद हटवू शकते.

Select the incorrect statement.

(1) The President appoints Chief Election Commissioner of India.

(2) The tenure of Chief Election Commissioner is 5 years or up to the age of 65 years, whichever is earlier.

(3) The Chief Election Commissioner enjoys the same status as the Judges of Supreme Court of India.

(4) The Chief Election Commissioner can be removed from office only through impeachment by Parliament.

---

37. योग्य जोड्या लावा.

| वित्त | आयोग अध्यक्ष |
|---|---|
| (अ) आठवा (1982-84) | (i) के. सी. पंत |
| (ब) दहावा (1992-94) | (ii) यशवंतराव चव्हाण |
| (क) बारावा (2002-04) | (iii) डॉ. विजय केळकर |
| (ड) तेरावा (2007-08) | (iv) डॉ. सी. रंगराजन |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iv | iii |
| (2) | ii | i | iii | iv |
| (3) | i | ii | iii | iv |
| (4) | ii | i | iv | iii |

Match the correct pairs.

| Finance | Commission Chairman |
|---|---|
| (a) Eighth (1982-84) | (i) K. C. Pant |
| (b) Tenth (1992-94) | (ii) Yashwantrao Chavan |
| (c) Twelfth (2002-04) | (iii) Dr. Vijay Kelkar |
| (d) Thirteenth (2007-08) | (iv) Dr. C. S. Rangarajan |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iv | iii |
| (2) | ii | i | iii | iv |
| (3) | i | ii | iii | iv |
| (4) | ii | i | iv | iii |



चाणक्य मंडल परिवार

38. केंद्रीय पातळीला आर्थिक साधनसामग्रीचे वाटप करण्याचे काम कोणता आयोग करतो?

(1) नियोजन आयोग (2) वित्त आयोग

(3) कॅग (4) यापैकी नाही

Which commission is responsible for allocating financial resources to the central level?

(1) Planning Commission (2) Finance Commission

(3) CAG (4) None of these

---

39. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील असावेत.

(ब) उपाध्यक्ष आणि तीन सदस्यांमध्ये कमीत कमी एका जागेवर महिलेची नियुक्ती करावी.

(क) आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.

(ड) डॉ. भगवानलाल सहानी हे आयोगाचे पहिले अध्यक्ष आहेत.

वरीलपैकी असत्य विधान ओळखा.

पर्यायी उत्तरे :

(1) वरील सर्व (2) फक्त अ, क

(3) फक्त ब, ड (4) यापैकी नाही

Consider the following statements.

(a) The Chairman of the National Commission for Backward Classes should belong to socially and educationally backward classes.

(b) A woman should be appointed to at least one post among the vice- chairman and three members.

(c) The Commission shall have the powers of a civil court.

(d) Dr. Bhagwan Lal Sahani is the first Chairman of the Commission.

Identify the incorrect statement among the above.

Alternative Answers :

(1) All of the above (2) Only a, c

(3) Only b, d (4) None of these



चाणक्य मंडल परिवार

40. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे कार्य कोणते?

(अ) पेसा कायदा, 1996 मधील तरतुदींची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करणे.

(ब) आदिवासी लोक जमिनीपासून वंचित झाल्यास त्यांचे पुनर्वसन करणे.

(क) आदिवासींमधील स्थलांतरित शेती पद्धती कमी करून अखेर बंद करण्यासाठी उपाययोजना करणे.

पर्यायी उत्तरे :

(1) वरील सर्व (2) फक्त अ, क

(3) फक्त ब, क (4) फक्त अ, ब

What is the function of National Commission for Scheduled Tribes?

(a) Taking measures to ensure full implementation of the provisions of the PESA Act, 1996.

(b) To rehabilitate tribal people if they are deprived of land.

(c) Taking measures to reduce and eventually stop shifting cultivation practices among tribals.

Alternative Answers:

(1) All of the above (2) Only a, c

(3) Only b, c (4) Only a, b

---

41. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या कर्तव्याशी संबंधित कायद्यातील तरतुदी खालीलपैकी कोणत्या खर्चाचे लेखापरीक्षण करतात?

(अ) भारताचा संचित निधी

(ब) प्रत्येक राज्याचा संचित निधी

(क) संसदीय कायदाने स्थापित झालेल्या RBI, LIC यांसारख्या संस्थांचे लेखे

(ड) भारताचा सार्वजनिक निधी

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क, ड (2) अ, ब, क

(3) ब, क ड (4) अ, ब, ड

The provisions of the act relating to the duties of the CAG of India to audit and report on the which of the following the expenditure?

(a) Consolidated fund of India.

(b) Consolidated fund of each state.

(c) Institutions like RBI, LIC established by Act of Parliament

(d) Public account of India.

Answer options :

(1) a, b, c, d (2) a, b, c

(3) b, c, d (4) a, b, d



चाणक्य मंडल परिवार

42. पुढीलपैकी कोणते नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे (CAG) काम नाही?
(1) शासन खर्चाचे लेखापरीक्षण करणे.
(2) शासन खर्चावर परिणाम करणाऱ्या वित्तिय नियमांचे व आदेशांचे पालन होते आहे किंवा नाही ते पाहणे.
(3) जे पदाधिकारी शासन खर्चाला मंजुरी देत आहेत, ते वैधानिक दृष्ट्या त्या कार्यासाठी सक्षम आहेत की नाही, ते पाहणे.
(4) कल्याणकारी योजनांच्या खर्चाची शिफारस करणे.
Which of the following isnot one of the functions of the Comptroller and Auditor Geneal?
(1) to audit government expenditure.
(2) to ensure that financial rules and orders impacting governmental expenditure are obeyed.
(3) to satisfy itself that those who sanction expenditure have the legal powers to do so.
(4) to recommend expenditure for welfare schemes.

---

43. घटनेतील कोणत्या कलमामध्ये राज्याचे महाधिवक्ता यांचा उल्लेख केलेला आहे?
(1) कलम 166 (2) कलम 165
(3) कलम 162 (4) कलम 167
Which article of the constitution mentions the office of the Advocate General of State?
(1) Article 166 (2) Article 165
(3) Article 162 (4) Article 167

---

44. राज्य लोकसेवा आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(1) आयोगाच्या अध्यक्षांसाठी कोणतेही पात्रतेचे निकष राज्यघटनेमध्ये सांगितलेले नाहीत.
(2) सुरुवातीस, आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांचे निवृत्तीचे वय 60 वर्षे होते ते 1975 च्या संसदेच्या कायद्याद्वारे वाढवून 62 वर्षे करण्यात आले आहे.
(3) आयोगाच्या एखाद्या सदस्याची त्याच लोकसेवा आयोगात पुन्हा दुसऱ्यांदा सदस्य म्हणून नेमणूक करता येत नाही परंतु त्यास त्याच आयोगात अध्यक्ष म्हणून किंवा अन्य राज्य लोकसेवा आयोगात अध्यक्ष म्हणून नेता येऊ शकते.
(4) वरीलपैकी एकही नाही.
Which one of the following statements about State Public Service Commission is false?
(1) The qualification of the chairman is not specified in the constitution.
(2) Initially, the retirement age of the chairman and members was 60 years, it was extended to 62 years by an act of Parliament in 1975.
(3) A member cannot be reappointed for the next term in the same Public Service Commission, however he can be appointed as the chairman of that SPSC or chairman of other Public Service Commission.
(4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

45. खालील विधानांपैकी कोणते अयोग्य आहे?

(1) राज्यघटनेचा भाग V मधील प्रकरण -I हे राज्याच्या महाधिवक्त्यासंबंधी आहे.

(2) राज्यघटनेचे अनुच्छेद - 165 हे राज्याच्या महाधिवक्त्यासंबंधात आहे.

(3) राज्यघटनेचे अनुच्छेद - 177 हे राज्य विधीमंडळाची सभागृहे आणि समितीच्या संदर्भातील राज्याच्या महाधिवक्त्याच्या अधिकारांशी संबंधित आहे.

(4) राज्यघटनेचे अनुच्छेद - 194 हे राज्याच्या महाधिवक्त्याचे अधिकार, विशेषाधिकार आणि कायदेशीर संरक्षण यासंबंधी आहे.

Which of the following statements isincorrect?

(1) Chapter -I of Part V of the Constitution deals with the Advocate General of the State.

(2) Article - 165 of the Constitution deals with the Advocate General of the State.

(3) Article 177 of the Constitution refers to Houses and Committees of the State Legislature of the State relates to the powers of the Advocate General.

(4) Article 194 of the Constitution states the powers, privileges and enactments of the Attorney General of the State.

---

46. भारतीय निर्वाचन आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) ज्या पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला पदावरून दूर केले जाते त्याच पद्धतीने मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर केले जाऊ शकते. त्यासाठी लोकसभा आणि राज्यसभा या संसदेच्या सभागृहांनी दोन तृतीयांश बहुताने ठराव मंजूर करावा लागतो.

(2) मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशीवरून राष्ट्रपती अन्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करू शकतात.

(3) निवडणूक आयुक्तास पदावरून दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांनी केलेली शिफारस राष्ट्रपतीवर बंधनकारक असते.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statements about the Election Commission of India is incorrect?

(1) The Chief Election Commissioner can be removed from their office in a manner similar to the removal of a judge of the Supreme Court which requires a resolution passed by the Parliament a two-thirds majority in both the Lok Sabha and Rajya Sabha.

(2) Other Election Commissioners can be removed by the President on the recommendation of the Chief Election Commissioner.

(3) The recommendation of Chief Election Commissioner for removing the Election Commissioner is binding on the President.

(4) None of the above.



चाणक्य मंडल परिवार

47. खालील विधाने विचारात घ्या व योग्य विधान/ने निवडा.

(अ) वित्त आयोगाने केलेल्या शिफारसी या केवळ सल्ला स्वरूपात असतात आणि त्या सरकारवर बंधनकारक नसतात.

(ब) ज्याअर्थी वित्त आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे, त्याअर्थी अत्यंत महत्त्वाच्या कारणांशिवाय भारत सरकारने त्याच्या शिफारसी नाकारू नयेत; असे मत चौथ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. राजमन्नार यांनी मांडले.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त ब (2) फक्त अ

(3) अ व ब (4) यापैकी नाही.

Consider the following sentences and select the correct sentence/s.

(a) The recommendations made by the finance commission are only of advisory nature and hence, not binding on the government.

(b) Since the finance commission is a constitutional body its recommendations should be turned down by Government of India unless there are very compelling reasons not was put forth by Dr. P. V. Rajamannar, chairman of fourth finance commission.

Answers Options:

(1) Only b (2) Only a

(3) a and b (4) None of the above

---

48. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची कार्ये-

(अ) अनुसूचित जातीच्या सुरक्षेसंबंधी सर्व बाबींचा शोध घेणे.

(ब) अनुसूचित जातीच्या हक्कांच्या उल्लंघनाबाबत विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे

(क) अनुसूचित जातीच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेबाबत सल्ला देणे.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ, ब (2) फक्त अ, क

(3) फक्त ब, क (4) वरील सर्व

Functions of National Commission for Scheduled Castes

(a) To look into all matters relating to the security of Scheduled Castes.

(b) Investigating specific complaints regarding Scheduled Caste rights violations.

(c) Advising on the planning process for socio-economic development of Scheduled Castes.

Alternative Answers:

(1) a, b only (2) a, c only

(3) b, c only (4) All of the above

49. खालील विधाने विचारात घ्या.
(अ) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या अध्यक्षांना केंद्रीय कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा असतो.
(ब) हा आयोग संसदेला वार्षिक अहवाल सादर करतो.
(क) आयोगाची रचना एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व तीन सदस्य अशी असते.
वरीलपैकी सत्य विधाने ओळखा.
पर्यायी उत्तरे :
(1) वरील सर्व (2) फक्त अ, क
(3) फक्त ब, क (4) फक्त अ, ब
Consider the following statements.
(a) The Chairperson of the National Commission for Scheduled Tribes holds the rank of a Union Cabinet Minister.
(b) This Commission submits an annual report to the Parliament.
(c) The composition of the Commission is one Chairman, one Vice-Chairman and three members.
Identify the correct statements from the above.
Alternative Answers:
(1) All of the above (2) Only a, c
(3) Only b, c (4) Only a, b

---

50. खालील विधाने विचारात घ्या. संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य _____.
(अ) सदस्य म्हणून पुनर्नियुक्ती करता येत नाही.
(ब) केंद्र किंवा राज्य सरकारच्या अंतर्गत कोणत्याही नोकरीसाठी अपात्र
(क) राज्यपालांसारखे घटनात्मक पद भूषववण्यासाठी अपात्र
पर्यायी उत्तरे :
(1) अ, ब, क बरोबर (2) ब, क बरोबर
(3) अ, क बरोबर (4) अ, ब बरोबर
Consider the following statements. A member of the Union Public Service Commission _____.
(a) Debarred from re-appointment as a member.
(b) Not eligible for any other employment under the central or state Government.
(c) Disqualified from becoming a constitutional functionary like a governer.
Which statement(s) is/are correct?
Alternative Answers:
(1) a, b, c are correct (2) b, c correct
(3) a, c correct (4) a, b correct

चाणक्य मंडल परिवार